


महानगरपालिका निवडणुका ऑक्टोबर मध्येच

e Paper

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत


वर्ष 4थे

www.metrocityvrutant.in | मंगळवार दिनांक 10/06/२०२५ | METRO CITY VRUTANT

संपादक : रफी हुसेन || पिंपरी चिंचवड व पुणे || पान 4 || अंक 126 || RNI - MAHMAR /2021/51259 || metrocity924@gmail.com


# मुंबईत मोठा रेल्वे अपघात

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



मुंबई , प्रतिनिधी : मध्य रेल्वेवरील मुंब्रा रेल्वेस्थानकाजवळ काल (9 जून) सकाळी 9.30 वाजताच्या सुमारास भयंकर रेल्वे दुर्घटना घडली. मुंब्रा रेल्वे स्थानकादरम्यान 13 जण रेल्वेमधून पडले. कसाऱ्याहून सीएसएमटीला जाणाऱ्या लोकलमध्ये प्रवासी लटकून जात होते. त्याचवेळी सीएसएमटीवरुन निघालेली दुसरी लोकल प्रवाशांना घासली. यावेळी 13 प्रवासी खाली पडले आणि 6 प्रवाशांचा मृत्यू झाला.

ठाण्याचे नायब तहसीलदार दिनेश पैठणकर यांनी माहिती दिली. दरम्यान जखमींवर कळवा आणि मुंब्र्यातील रुग्णालयात उपचार सुरु आहेत. 10 जखमींपैकी एकाचा मृत्यू झाल्याची माहिती कळवा रुग्णालयाने दिली. तर कळव्यातील काही जखमींना ठाण्याच्या ज्युपिटर रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. सदर अपघात झाला तेव्हा सुरुवातीला पुष्पक एक्सप्रेसमधून प्रवासी खाली पडल्याची माहिती सांगण्यात येत होती. मात्र पुष्पक एक्सप्रेसचा काहीही संबंध नसल्याची माहिती मध्य रेल्वेचे माहिती अधिकारी स्वप्नील निला यांनी दिली.

मध्य रेल्वेचे माहिती अधिकारी स्वप्नील निला यांनी सगळी घटना सांगितली-

लोकलमधून प्रवासी फूटओव्हरवरुन प्रवास करत होते. एका ट्रॅकवरुन सीएसएमटीकडे लोकल जात होती. तर दुसऱ्या ट्रॅकवरुन कसाराच्या दिशेने लोकल जात होती. यावेळी दोन्ही लोकलमधील दरवाजावरील प्रवाशांची बॅग एकमेकांना घासली गेली. सकाळी 9.30 वाजता ही दुर्घटना घडली आणि 9.50 पर्यंत ॲम्युबलन्स दाखल झाल्या आहेत आणि रुग्णालयात उपचारांसाठी दाखल करण्यात आलेली आहे, अशी माहिती स्वप्नील निला यांनी दिली. मुंब्रा आणि दिवा दरम्यान ही घटना घडली. अप आणि डाऊन दरम्यानच्या लोकल दरम्यान प्रवासी फूटओव्हरवरुन प्रवास करत होते. अशात त्यांची टक्कर झाली किंवा बॅग लागला आणि धक्का लागला त्यामुळे ही 8 लोकं खाली पडलीत.

रेल्वेने उपाययोजना करण्यासंदर्भातच नव्या लाईनचे नियोजन केले आहेत. ठाणे ते सीएसएमटी सहाव्या लाईनपर्यंत अपग्रेड करणार आहोत. कार्यालयांना देखील विनंती केली होती की कार्यालयातील वेळेमध्ये केले तर चांगलं होईल. लोकांचा देखील सहयोग गरजेचा आहे, उपाययोजना आपण करत आहोत. पश्चिम आणि मध्यमध्ये अनेक गोष्टी वेगळ्या आहेत. मध्य रेल्वेची फ्रिक्वेन्सी अधिक आहेत, ब्रिज आणि टनेल अधिक आहेत.

### मध्य रेल्वेवर अपघात नेमका कसा झाला?

- अपघात लोकल रेल्वेवरचा आहे, एक्सप्रेसमधील नाही
- दोन लोकल ट्रेन आजूबाजूने जात असताना ही घटना घडली
- दिवा ते मुंब्रा दरम्यान ही दुर्घटना घडली
- एक लोकल कसाराकडून सीएसटीकडे जात होती तर दुसरी लोकल सीएसटीकडून कल्याणकडे जात होती
- सकाळी साडे नऊ वाजता दरम्यानची घटना
- दोन्ही लोकलच्या दरवाजात उभे असलेले प्रवासी पडले
- दोन्ही लोकलमधील प्रवाशांचा एकमेकांना धक्का लागला
- बॅगांची गुंतागुंत झाली आणि ही घटना घडल्याची शक्यता
- पुष्पक एक्सप्रेसचा या घटनेशी कोणताही संबंध नाही
- एकूण 13 जणांना रुग्णालयात दाखल केले आहे.

# विधी विद्यार्थ्यांनी घेतली आयुक्तांची शाळा!

## 'सुनियोजित विकासासाठी प्रशासन कटिबद्ध!' - आयुक्त शेखर सिंह

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



'पिंपरी - चिंचवड शहराच्या सुनियोजित विकासासाठी प्रशासन कटिबद्ध आहे!' अशी ग्वाही पिंपरी - चिंचवड महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनी महापालिका मुख्य प्रशासकीय इमारत सभागृह, पिंपरी येथे सोमवार, दिनांक ०९ जून २०२५ रोजी दिली. दर्द से हम दर्द तक ट्रस्ट आणि विधी सेवा प्राधिकरण पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'महाराष्ट्र महानगरपालिका कायद्याच्या तरतुदी आणि अंमलबजावणी' या विषयावरील मार्गदर्शनपर व्याखानातून शेखर सिंह यांनी विधी महाविद्यालयाचे विद्यार्थी आणि नवोदित वकील यांच्याशी सुसंवाद साधला. विधी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी मार्मिक आणि बेधडक प्रश्न विचारून आयुक्त शेखर सिंह यांची शाळा घेतली; परंतु शेखर सिंह यांनी प्रत्येक प्रश्नाला समाधानकारक उत्तर दिले. विधी सेवा प्राधिकरण पुणे अध्यक्ष तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश महेंद्र महाजन, सचिव सोनल पाटील यांचे मार्गदर्शनाने कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

यावेळी उद्योगपती बधुवेल बलिद, दर्द से हम दर्द तक ट्रस्टचे ॲड. सतिश गोरडे, ॲड. हिमांशु माने यांची प्रमुख उपस्थिती होती. पिंपरी - चिंचवड महानगरपालिकेतील जनतेच्या तक्रारींवर कसे लक्ष ठेवले जाते आणि प्रत्येक समस्या कशा पद्धतीने सोडविली जाते याविषयी विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना शेखर सिंह यांनी सविस्तर उत्तर देताना पिंपरी - चिंचवड महानगरपालिका 'सारथी'सारख्या तंत्रज्ञानदृष्ट्या प्रगत संगणकीय कार्यप्रणालीचा वापर करून जनतेने पाठविलेल्या प्रत्येक तक्रारीची वर्गवारी करून दखल घेते. पाणीपुरवठा, स्वच्छता आणि साफसफाई यासारख्या मूलभूत सुविधांचा प्राधान्याने निपटारा केला जातो. ज्या समस्या प्रलंबित आहेत त्यांचा विभागनिहाय पाठपुरावा केला जातो. याबाबत अधिकाऱ्यांच्या कामगिरीनुसार आणि केलेल्या उपाययोजनांबाबत पाच गुण कमी केले जातात. त्यामुळे प्रशासकीय वचक राहतो आणि समस्या दीर्घकाळ प्रलंबित राहत नाहीत, अशी माहिती शेखर सिंह यांनी दिली. कार्यक्रमाच्या संयोजनात ॲड. खेताराम सोळंकी, ॲड. सोहम यादव, ॲड. संकेत राव, ॲड. महेश सोनवणे, ॲड. हृषीकेश शर्मा यांनी सहकार्य केले. अनुष्का शिंदे यांनी सूत्रसंचालन व हरदित सिंग यांनी आभार मानले.

# महानगरपालिका निवडणुका ऑक्टोबर मध्येच

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका ऑक्टोबर मध्ये होणार असल्याचे राज्य निवडणूक आयोगाचे आयुक्त दिनेश वाघमारे यांनी स्पष्ट केले. राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्था म्हणजेच महानगरपालिका, जिल्हा परिषद ,पंचायत समितीच्या निवडणुका चार महिन्याच्या आत घेण्यात याव्यात असे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिल्यानंतर राज्य निवडणूक आयोग तयारीला लागले. राज्यात 20 मनपा ,257 नगरपालिका, 20 जिल्हा परिषद आणि 288 पंचायत समिती यांच्या चार महिन्याच्या आत निवडणुका घ्याव्यात असे सर्वोच्च न्यायालयाचे आदेश आल्यानंतर निवडणूक प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी किमान चार महिन्याचा कालावधी लागतो आणि या निवडणुका चार महिन्याच्या आत घेण्यासाठी प्रशासकीय नियोजनानुसार तीन टप्प्यात निवडणुकांचे नियोजन




करण्यात आले असल्याची माहिती निवडणूक आयोगाचे आयुक्त दिनेश वाघमारे यांनी दिली

राज्य निवडणूक आयोगाने सर्व स्वराज्य संस्थांना जून अखेर पर्यंत प्रभाग रचना करण्याचे आदेश दिले, निवडणूक आयोगानुसार पहिल्या टप्प्यात उत्तर व दक्षिण महाराष्ट्रात मतदान होईल दुसऱ्या टप्प्यात विदर्भ पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाडा तर तिसऱ्या टप्प्यात मुंबई, ठाणे आणि कोकण मध्ये मतदान होईल अशी आखणी करण्यात आली आहे.

खरं म्हणजे राज्य निवडणूक आयोगाकडे या स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पार पाडण्यासाठी ईव्हीएम मशीन पुरेशी नाहीत आयोगाकडे फक्त 65000 ईव्हीएम असल्यामुळे तीन टप्प्यात निवडणूक घेण्याची तयारी राज्य निवडणूक आयोग करत आहेत. एकाच टप्प्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी जास्त ईव्हीएम ची गरज भासणार आहे आणि राज्य निवडणूक आयोगाकडे ईव्हीएम मशीनचा तुटवडा असल्याने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका या तीन टप्प्यात घेण्यात येणार आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर करण्यापूर्वी पावसाचाही अंदाज घेण्याt येणार आहे त्यानुसार हवामान खात्याचे तज्ञ अधिकाऱ्यांची चर्चा करण्यात येईल असेही राज्य निवडणूक आयोगाच्या वतीने सांगण्यात आले आहे.

मागील तीन वर्षापासून लांबलेल्या महानगरपालिकांच्या निवडणुकाआता या ऑक्टोबर मध्ये होणार असणाऱ्या महानगरपालिका निवडणुकी करिता इच्छुक उमेदवारांनी तयारीला लागावे असे आदेश प्रत्येक राजकीय पक्ष आपल्या उमेदवारांना देत आहे तसेच प्रत्येक राजकीय पक्ष निवडणुकीची तयारी करत आहे. भाजप, राष्ट्रवादी, शिवसेना, राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्ष, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे व काँग्रेस पक्ष आपापल्या उमेदवारांची चाचपणी करत असल्याचेही सांगण्यात येत आहे तसेच महानगरपालिका निवडणुकीत महायुती किंवा महाविकास आघाडी एकत्र लढतील की प्रत्येक पक्ष हा स्वबळावर लढणार याकडेही सर्वांचेच लक्ष लागले आहे.

# दुबईमित्र' सोमनाथ पाटील यांचा पुण्यात हृद्य सत्कार

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी, पुणे : गेल्या काही वर्षांत मराठीजनांचे, विशेषतः पुणेकरांचे दुबईतील चैतन्यशील मित्र, साहित्य, संस्कृती, नाट्य, संगीत, चित्रपट कलावंत आणि राजकीय व्यक्तींचे स्नेही, दुबईसह बेळगाव आणि परिसरातील सामाजिक क्षेत्रात आपल्या कार्याचा ठसा उमटवणारे सोमनाथ पाटील यांचा हृद्य सत्कार रविवारी (दि. ८) पुण्यात करण्यात आला. यावेळी दुबई आणि संयुक्त अरब अमिरातीमधील त्यांच्या कार्यावर आधारित पुस्तकाचेही मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन झाले.

दुबई सरकारमध्ये ३७ वर्षे उच्चपदावर असलेल्या सोमनाथ पाटील यांच्या पुण्यातील मित्र परिवाराच्या वतीने हा अनौपचारिक समारंभ आयोजित करण्यात आला होता. चित्रपट दिग्दर्शक, निर्माते आणि अभिनेते प्रवीण तरडे या समारंभाचे प्रमुख पाहुणे होते. सहकार



बँकींगतज्ज्ञ आणि राज्य सरकारी बँकेच्या प्रशासकीय मंडळाचे अध्यक्ष विद्याधर अनास्कर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.

पुण्यभूषण फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. सतीश देसाई, संवाद संस्थेचे सुनील महाजन, पीसीईटीचे कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई, ज्येष्ठ उद्योजक कल्याण तावरे, उद्योजक समीर लडकत, युवराज शहा, संतोष मोरे, 'एमईडीसी'चे उपाध्यक्ष सचिन ईटकर, खानापूर-बेळगाव मित्रमंडळाचे अध्यक्ष पीटर डिसूझा, निवृत्त ब्रिगेडियर किशोर जाधव, पिंपरीतील प्रसिद्ध सर्जन डॉ. शहाजी चव्हाण, डॉ. सतीश जगताप, मिलिंद कुलकर्णी, कैलास केंजळे, रणजित देशमुख आदी उपस्थित होते. डॉ. पी. डी. पाटील, (कुलपती, डी. वाय. पाटील विद्यापीठ), अशोक विखे पाटील (अध्यक्ष, विखे पाटील फाउंडेशन), शिवाजीराव कदम (कुलपती, भारती विद्यापीठ) यांनी सोमनाथ पाटील यांना आभासी माध्यमातून शुभेच्छा दिल्या. सोमनाथ पाटील यांच्या पत्नी शालन पाटील यांचाही सत्कार करण्यात आला. एकेकाळी पर्शियाच्या आखातामधील हे छोटं खेडेगाव असलेलं दुबई आज श्रीमंती मिरवणारं जगप्रसिद्ध शहर बनलं आहे. हे शहर वसवण्यात असंख्य भारतीयांचा वाटा फार मोठा आहे. त्यांच्या मेहनतीतून, सर्जनातून दुबईचा कायापालट झाला. सोमनाथ पाटील त्यापैकी एक. बेळगावजवळच्या छोट्या गावातून ऐंशीच्या दशकात शारजाह आणि नंतर दुबईत बांधकाम अभियंता म्हणून गेलेले सोमनाथ पाटील तिथल्या सरकारमध्ये इलेक्ट्रिसिटी आणि वॉटर विभागाचे व्यवस्थापक आणि प्रकल्प सल्लागार बनले. दुबई सरकारचे अनेक उपक्रम सोमनाथ पाटील यांनी यशस्वी केले. त्यांना संयुक्त अरब अमिराती सरकारचा अत्यंत प्रतिष्ठेचा पुरस्कार संयुक्त अरब अमिरातीचे उपाध्यक्ष आणि पंतप्रधान शेख मोहम्मद बिन रशीद अल मकतूम यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला होता.

# 10वी व 12वी गुणवंत विद्यार्थी सत्कार समारंभ

## संदीप वाघेरे यांचा स्तुत्य उपक्रम



दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी मा. नगरसेवक संदीप भाऊ वाघेरे यांच्या वतीने आयोजित प्रभाग क्रमांक २१ व परिसरातील १०वी व १२ वी गुणवंत विद्यार्थी सत्कार समारंभ आणि शालेय साहित्य वाटप कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमात गुणवंत विद्यार्थ्यांना लॅपटॉप, टॅब,व स्कूल बॅग तसेच शालेय साहित्य वाटप करून त्यांच्या यशाचा गौरव करण्यात आला.

कार्यक्रमास करिअर मार्गदर्शनासाठी श्री. विवेक वेलणकर सर यांनी विशेष उपस्थिती लावून विद्यार्थ्यांना करिअर निवडीसंदर्भात महत्त्वपूर्ण मार्गदर्शन केले. "गुणवत्ता ही परीक्षेपुरती मर्यादित नसून, ती तुमच्या विचारात आणि कृतीत दिसली पाहिजे. योग्य करिअर निवड ही यशस्वी आयुष्याची पहिली पायरी आहे, त्यामुळे स्वप्न मोठी ठेवा आणि त्यासाठी सतत प्रयत्न करत राहा." यश मिळवण्यासाठी आवश्यक असलेल्या स्वअनुशासन, ध्येय निश्चिती, सातत्य आणि सकारात्मक विचारसरणी यांचे महत्त्व सांगितले. "यश हे अपघाताने मिळत नाही, ते नियोजन, प्रयत्न आणि योग्य दृष्टिकोनातून घडवावे लागते," असे ते म्हणाले.

यावेळी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना वाघेरे म्हणाले कि, "यश हे नशिबावर नाही, तर प्रयत्नांवर अवलंबून असतं."ही उक्ती आपल्या परिसरातील गुणवंत विद्यार्थ्यांनी खरं करून दाखवली आहे. शिक्षण आणि विद्यार्थी हे समाजाचे भविष्य आहेत म्हणूनच आजचा हा सत्कार समारंभ म्हणजे सन्मान आहे त्या मूल्यांचा – जे आपल्याला घडवतात, शिकवतात आणि पुढे जाण्याची दिशा देतात.आपल्या भागातील विद्यार्थ्यांना उत्तम शैक्षणिक सुविधा, योग्य मार्गदर्शन आणि हक्काचं व्यासपीठ मिळावं यासाठी माझे प्रयत्न नेहमी असेच राहतील.आज आपण इथे ज्यांचा सत्कार करतो आहोत, ते उद्या आपले डॉक्टर, अभियंते, प्रशासन अधिकारी, उद्योजक किंवा वैज्ञानिक बनतील – आणि देशाच्या प्रगतीत मोलाची भूमिका बजावतील अशी आशा व्यक्त करतो.

कार्यक्रमात मोठ्या संख्येने विद्यार्थी, पालक, शिक्षक व स्थानिक नागरिकांनी सहभाग नोंदवला. संदीप भाऊ वाघेरे यांनी उपस्थित सर्व मान्यवरांचे व विद्यार्थ्यांचे आभार मानले आणि असे उपक्रम सातत्याने राबविण्याचे आश्वासन दिले.

या कार्यक्रमास महाराष्ट्र विधानसभा उपाध्यक्ष मा. अण्णा बनसोडे, भाजप शहराध्यक्ष शत्रुघ्न बापू काटे, तसेच मा. नगरसेवक शीतल उर्फ विजय शिंदे व मा. नगरसेवक मोरेश्वर शेडगे.पवना बँकेचे संचालक शिवाजी वाघेरे,सुभाष वाघेरे, शांताराम सातव,रामभाऊ कुदळे,वसंत तावरे,सुधाकर यादव आदी मान्यवरांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाचे नियोजन युवा मंचचे अध्यक्ष हरीश वाघेरे, चंद्रशेखर अहिरराव,गणेश मंजाळ,विठ्ठल जाधव,किरण शिंदे,शुभम मिटकरी,विक्की नाईक,मयूर कचरे,रंजना जाधव,समीक्षा चिकणे,प्रीती साळे यांनी केले.

# रिंग करण्याच्या प्रयत्नात अडकली बेंच खरेदी निविदा

## मनपाच्या भांडार विभागाची चौकशी करा ,राहुल कोल्हटकर यांची मागणी





दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी चिंचवड महानगरपालिका भांडार विभाग यांच्या वतीने शहरातील शाळांच्या करिता बेंच (बाक) खरेदी करिता विशिष्ठ ठेकेदार यांना फायदा होईल या हेतूने दिनांक २०.१२.२०२४ ते ३१.१२.२०२४ या कालावधीत जी निविदा प्रक्रियाराबविण्यात आली आहे या निविदा प्रक्रियेत रिंग करण्याच्या प्रयत्नात बेंच खरेदी निविदा प्रक्रिया अडकली असल्याचा संशय सामाजिक कार्यकर्ते राहुल कोल्हटकर यांनी व्यक्त केला आहे. तसेच याबाबत भंडार विभागाचे उपायुक्त निलेश भदाणे यांची चौकशी करण्यात यावी अशी मागणी राहुल कोलाटकर यांनी महानगरपालिकेचे आयुक्त शेखर सिंह यांच्याकडे केली आहे तसेच विद्यार्थी बेंच पासून वंचित राहू नये याबाबत सदर निविदा प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण करण्याचे आदेश देण्यात यावे अशी मागणी राहुल कोल्हटकर यांनी केली आहे.

मर्जीतील ठेकेदार पात्र व्हावा म्हणून त्याला डोळ्यासमोर ठेवून अटी शर्ती टाकण्यात आल्या मग जेव्हा निवेदनाच्या माध्यमातूनच मागणी केली तेव्हा अनुभव अटीत बदल केला आणि अटी शर्ती बदलल्या असे दाखविण्यात आले.

पण खरे पाहता त्या ठेकेदाराला पात्र होता येईल अशा पद्धतीने ही निविदा बनविण्यात आली आणि तो ठेकेदार पात्र सुद्धा झाला पण जेव्हा कागदपत्रं सादर करण्यात आली तेव्हा सदर कागदपत्रं आणि अनुभव प्रमाणपत्र यात फेरफार करून ती बनावट, खोटी असल्याबाबत टेंडर लिपिक यांना शंका आल्याने त्याने सदर निविदा प्रक्रियाबाबत ( टेंडर फाईल वर शेरा देऊन ) उपायुक्त श्री.निलेश भदाने यांना कळविले आहे.

तरी सुद्धा उपायुक्त श्री.निलेश भदाने हे कोणतेही कारवाई संबधीत निविदा बाबत अथवा ठेकेदाराच्या बाबत करत नसल्याने त्याच्या कामाबाबत शंका निर्माण होत आहे.

तरी सदर निविदा पारदर्शक होण्यासाठी सदर निविदा प्रक्रिया पुन्हा नव्याने राबवण्यात यावी तसेच विशिष्ठ किंवा ठराविक ठेकेदार यांना लाभ होण्याच्या हेतूने अटी शर्ती तयार करून टेंडर प्रक्रियेत रिंग करणाऱ्या भांडार विभागाचे उपायुक्त निलेश भदाने यांची चौकशी करण्यात यावी आणि या निविदा प्रक्रियेचे अधिकार त्यांच्या कडून काढून घेण्यात यावे. अशी मागणी राहुल कोल्हटकर यांनी केली आहे.

# राज्यातील पहिल्या महसूल लोक अदालतीचे उद्घाटन

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पुणे, नागपूर जिल्ह्यात महसूल विभागाला अत्याधुनिक बहुउद्देशीय (मल्टिपर्पज) वाहने देण्याचा निर्णय यापूर्वी शासनाने घेतला असून राज्यातील पुणे, नाशिक, अमरावती, छत्रपती संभाजीनगर, कोकण महसूली विभागीय मुख्यालयांच्या ठिकाणीदेखील यावर्षी अशी वाहने महसूल विभागाला देण्यात येतील, अशी घोषणा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केली.



राज्यात पहिल्यांदाच पुणे जिल्ह्यात आयोजित केलेल्या महसूल लोक अदालतीच्या उद्घाटन कार्यक्रमात ते बोलत होते. जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित या कार्यक्रमास महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, आमदार भीमराव तापकीर, बापूसाहेब पठारे, प्रभारी विभागीय आयुक्त कविता द्विवेदी, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, अपर जिल्हाधिकारी सुहास मापारी, माजी राज्यमंत्री संजय उर्फ बाळा भेगडे, पक्षकार, वकील यांच्यासह दूरदृष्यप्रणालीद्वारे जिल्ह्यातील उपविभागीय अधिकारी, तहसीलदार उपस्थित होते.

अधिकाऱ्यांकडून चांगल्या कामाची अपेक्षा करत असताना त्यांनाही पायाभूत सुविधा पुरविल्या पाहिजेत, असे सांगून उपमुख्यमंत्री श्री. पवार म्हणाले, त्यादृष्टीने पहिल्या टप्प्यात सर्व विभागीय आयुक्तालयांच्या ठिकाणी आणि त्यानंतर टप्प्या-टप्प्याने इतर जिल्ह्यांतील महसूल विभागाला वाहने उपलब्ध करून दिली जातील.

आजच्या महसूल अदालतीत जवळपास ११ हजार महसूली दावे तडजोडीने निकाली निघणार असल्याने महसूल विभाग आणि न्याय व्यवस्थेवरीलही ताण कमी होणार आहे. पुढील अनेक वर्षे चालणारे खटले थांबणार असून त्यातून जनतेच्या आणि प्रशासनाच्या वेळेची, पैशाची आणि श्रमाची बचत होणार आहे. वाद संमतीने किंवा तडजोडी मिटल्याने गावातील भांडणे संपतील, जमिनीच्या वादामुळे कलुषित झालेली मने स्वच्छ होतील. घरात, गावात शांततेचे आणि आनंदाचे वातावरण निर्माण होईल. उर्वरित २० हजार दावेही अशा महसूल अदालतीचे आयोजन करुन तडजोडीने निकाली काढावेत, असेही ते म्हणाले.

प्रशासन आपली जबाबदारी बजावत असताना जे गुन्हेगारीवृत्तीने काम करतात अशांविरोधात महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायद्यानुसार (मकोका) कारवाई केली पाहिजे. त्यादृष्टीने कायद्यात बदल करणे गरजेचे आहे, असेही ते म्हणाले. शासनाचे जे विभाग अधिकाधिक महसूल शासनाच्या तिजोरीत आणतील त्यांना त्याप्रमाणात प्रोत्साहन निधी देण्याचा निर्णय घेतला आहे, अशी माहिती श्री. पवार यांनी दिली.

राज्य शासनातर्फे विविध भव्य शासकीय इमारती उभारण्यात येत आहेत. यशदा येथे मसुरीच्या धर्तीवर राज्यातील अधिकाऱ्यांसाठी देशात इतर कोणत्याही राज्यात नसेल असे भव्य प्रशिक्षण केंद्र उभारण्यात येणार आहे. त्यासाठी १२० एकर जागा उपलब्ध करून देण्यात आली आहे, अशी माहितीदेखील उपमुख्यमंत्र्यांनी यावेळी दिली.

# अनोखा अनुभव देणाऱ्या 'समसारा' चित्रपटाची उत्कंठा शिगेला

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

गेल्या अनेक दिवसांपासून चर्चेत असलेल्या "समसारा" या हॉरर चित्रपटाची टीजरमुळे उत्सुकता निर्माण झाली आहे. मात्र, नुकत्याच लॉंच करण्यात आलेल्या ट्रेलरमुळे या चित्रपटाविषयीची उत्कंठा आता अजूनच शिगेला पोहोचली आहे. चित्रपटातील प्रमुख व्यक्तिरेखांचा इतिहास काय? त्यांच्या आयुष्यातलं गूढ काय? असे अनेक प्रश्न या ट्रेलरने निर्माण केले असून, "समसारा" हा चित्रपट येत्या २० जूनला संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होणार आहे. संचय प्रॉडक्शन्सच्या पुष्कर योगेश गुप्ता यांची निर्मिती असलेल्या "समसारा" या चित्रपटाचं दिग्दर्शन सागर लढे यांनी केले आहे.



जन्म आणि मृत्यू यांच्या दरम्यान घडणारी एक गूढरम्य गोष्ट समसारा हा चित्रपटाच्या केंद्रस्थानी आहे. गूढरम्य गोष्टीला अनुभवी अभिनेत्यांची साथ लाभली आहे. सायली संजीव, ऋषी सक्सेना, डॉ. गिरीश ओक, पुष्कर श्रोत्री यांच्या नेमक्या व्यक्तिरेखा, त्यांना असलेला गूढ इतिहास अत्यंत रंजक असल्याचं ट्रेलरमधून जाणवतं आहे. त्याशिवाय पार्श्वसंगीत, छायांकन, व्हिज्युअल इफेक्ट्सही उत्तम दर्जाचे असल्याचं ट्रेलर मधून जाणवतं आहे. त्यामुळेच चित्रपटाचा ट्रेलर अत्यंत गुंतवणारा, भयाचा आणि रहस्याचा अनुभव देणारा असल्याचंही दिसतं आहे. मराठी चित्रपटांत हॉरर प्रकार फारसा हाताळला गेलेला नसल्यानं "समसारा" एक वेगळा प्रयोग ठरणार आहे यात शंका नाही.

सागर लढे, विश्वेश वैद्य, समीर मानेकर यांच्या कथेवर समीर मानेकर, सागर लढे यांनी चित्रपटाची पटकथा रचली आहे. तर समीर मानेकर, निहार भावे यांनी संवादलेखन केलं आहे. विश्वेश वैद्य यांनी संगीत, अक्षय राणे छायांकनाची जबाबदारी निभावली आहेत. कार्यकारी निर्माता म्हणून महेश भारंबे व अन्वय नायकोडी काम पाहिले आहे."समसारा" चित्रपटाचा अनोखा अनुभव मोठ्या पडद्यावरच घेणे महत्त्वाचे असून, त्यासाठी आता २० जूनपर्यंत वाट पहावी लागणार आहे.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 8999948968